MHRT030024002018

दाखल तारीख -- २१/१२/२०१८

नोंदणी तारीख -- २१/१२/२०१८

निकाल तारीख -- ०४/०४/२०२६

कालावधी -- वर्षे महिने दिवस

०७– ०३ – १३

**रत्नागिरी येथील मुख्य न्यायदंडाधिकारी यांचे न्यायालयात**

(पीठासीन अधिकारी श्रीम.एस.एस.पिंगळे यांचेसमोर)

**न्यायनिर्णय दिनांकः – ०४/०४/२०२६**

**नियमित फौजदारी खटला क्रमांक २४८/२०१८**

**निशाणी ४८**

पुर्णगड सागरी पोलीस ठाणे गु.र.क्र.३८/२०१८

**फियादी/सरकार पक्षः** **महाराष्ट्र सरकार** तर्फे पोलीस ठाणे अधिकारी,
पुर्णगड सागरी पोलीस ठाणे, ता. जि. रत्नागिरी.

**सरकार पक्षातर्फेः** सहा. सरकारी अभियोक्ता श्री. पी.ए.सावंत.

**आरोपीः** १. **ओंकार रामचंद्र नैकर,**
वय सु. – २७ वर्षे, व्यवसाय – मोलमजूरी,
रा. पावस, नालेवठार, ता. जि. रत्नागिरी

**आरोपीतर्फे वकीलः** श्री.एस.एस.नाचणकर

**आरोपीः** 		**२. सिद्धेश राजेंद्र शिवगण,**

वय सु. – २९ वर्षे, व्यवसाय – मोलमजूरी,

रा. गावखडी, शिवगणवाडी, ता. जि. रत्नागिरी

**आरोपीतर्फे वकीलः** 		श्री.एस.एस.नाचणकर

| | |
|---|---|
| गुन्हा तारीख | १८/०७/२०१८ |
| पहिली खबर तारीख | १८/०७/२०१८ |
| दोषारोपपत्र दाखल तारीख | २१/१२/२०१८ |
| दोषारोप निश्चीतीची तारीख | १८/०६/२०१९ |
| पुरावा सुरु झाल्याची तारीख | ०७/१२/२०२२ |
| न्यायनिर्णय राखीव ठेवल्याची तारीख | -- |
| न्यायनिर्णयाची तारीख | ०४/०४/२०२६ |
| शिक्षेची तारीख, लागू असल्यास | -- |

| आरोपी क्रमांक | आरोपीचे नाव | अटकेची तारीख | जामिनावर खुले केल्याची तारीख | दोषारोप ठेवलेले गुन्हे | निर्दोष मुक्त केले की शिक्षा | दिलेली शिक्षा | फौ. प्र. सं. कलम ४२८ करीता संपरिक्षे दरम्यान निरुद्धकेलेला कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | ओंकार रामचंद्र नैकर | १८/०७/२०१८ | ०१/०८/२०१८ | भा.दं.वि.क. ३७९ सह ३४ | निर्दोष मुक्त | -- | -- |
| २. | सिद्धेश राजेंद्र शिवगण | १८/०७/२०१८ | ०१/०८/२०१८ | भा.दं.वि.क. ३७९ सह ३४ | निर्दोष मुक्त | -- | -- |

## अभियोग पक्षातर्फे साक्षीदारांची यादी

| सा. क्र. | साक्षीदाराचे नाव | निशाणी क्रमांक | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|---|
| १. | योगेश तानाजी बाणे | २४ | फिर्यादी |

## बचाव पक्षातर्फे साक्षीदारांची यादी

| सा. क्र. | साक्षीदाराचे नाव | निशाणी क्रमांक | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|---|
| — | — | — | —— |

## न्यायालयीन साक्षीदारांची यादी

| सा. क्र. | साक्षीदाराचे नाव | निशाणी क्रमांक | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|---|
| —— | —— | —— | —— |

## अभियोग पक्षातर्फे दाखल कागदपत्र

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | कागदपत्रांचे वर्णन |
|---|---|---|
| १. | २५/स.सा.क्र.१ | लेखी फिर्याद |

## बचाव पक्षातर्फे मान्य केलेली कागदपत्र

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | कागदपत्रांचे वर्णन |
|---|---|---|
| —— | —— | —— |

## बचाव पक्षातर्फे दाखल केलेली कागदपत्र

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | कागदपत्रांचे वर्णन |
|---|---|---|
| —— | —— | —— |

## न्यायालयीन कागदोपत्री निशाण्यांची यादी

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | कागदपत्रांचे वर्णन |
|---|---|---|
| -- | -- | -- |

## मुद्देमाल

| अ.क्र. | मुद्देमाल वस्तू क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| १. | -- | सॅमसंग कंपनीचा मोबाईल सीमकार्डसह |
| २. | -- | रोख रक्कम रु.२९५/- |
| ३. | -- | आयटेल कंपनीचा मॉडेल नंबर आयटी १५०८ प्लस मॉडेलचा मोबाईल सीमकार्डसह |
| ४. | -- | रोख रक्कम रु.९००/- |
| ५. | -- | गुलाबी काळ्या रंगाची लेडीज पर्स |
| ६. | -- | दोन ग्रॅम वजनाची सोन्याची नथ |
| ७. | -- | एक ग्रॅम वजनाचा सोन्याचा मोहर्त मणी |
| ८. | -- | रोख रक्कम रु.१२०५/- |
| ९. | -- | आधारकार्ड योगेश तानाजी बाणे, योजना योगेश बाणे, चंद्रभागा तानाजी बाणे, काजळ मंगेश बाणे, चिन्मय योगेश बाणे, निकुंज योगेश बाणे, वैशाली पांडुरंग थोरबुके यांचे |
| १०. | -- | पॅनकार्ड योगेश तानाजी बाणे व योजना योगेश बाणे यांचे |
| ११. | -- | भारत निवडणुक आयोग ओळखपत्र योजना |

| | | |
|---|---|---|
| | | योगेश बाणे यांचे |

..............................................

## न्यायनिर्णय

(खुल्या न्यायालयात जाहिर)

आरोपी क्र.१ व २ यांच्या विरुद्ध भारतीय दंड विधान,१८६० चे कलम ३७९ सह ३४ अन्वये दोषारोपपत्र दाखल करण्यात आले होते.

२. अभियोग पक्षाची थोडक्यात हकीकत खालीलप्रमाणे आहे –

यातील फिर्यादी योगेश तानाजी बाणे हा कुंभवडे, व्हाऊळवाडी, ता. राजापूर, जि. रत्नागिरी येथे रहातो. तो व त्याची पत्नी योजना असे आठवडा बाजार येथे भाजी विक्रीचा व्यवसाय करतात. त्याच्या मालकीची बोलेरो गाडी नं.एम.एच.०४/डब्ल्यू/१७४२ आहे. दि.१८/०७/२०१८ रोजी सकाळी ०९.०० वा. पावस येथे आठवडा बाजार असल्याने पावस येथे तो व त्याची पत्नी असे मॅक्स गाडीने भाजी विक्रीकरीता आले. सदर आठवडा बाजार पावस ग्रामपंचायतीजवळ भरतो. त्याने भाजीचे दुकान पावसकर हॉटेलशेजारी लावून त्याची गाडी स्टॉलच्या मागच्या बाजूला असलेल्या वडाच्या झाडाखाली उभी करुन ठेवली. त्या गाडीतील केबिनमधील लॉकरमध्ये त्याच्या पत्नीची पर्स ठेवलेली होती. दि.१८/०७/२०१८ रोजी संध्याकाळी ०५.०० वा. चे सुमारास त्याच्या शेजारील भाजी विक्री दुकानदार लक्ष्मण धोत्रे हे त्यांच्या स्वतःच्या टेम्पोजवळ गेले असता त्यांना दोन्ही आरोपी हे फिर्यादीच्या गाडीत बसलेले दिसले. त्याने फिर्यादीला हाक मारुन बोलावून घेतले. त्यावेळी आरोपी हे पळून गेले. फिर्यादीने त्याच्या गाडीतील लॉकरमध्ये ठेवलेल्या पर्सची पहाणी केली असता त्यात सोन्याची नथ व सोन्याचा मोहर्तमणी, रोख रक्कम रु.१६००/–, त्याचे व त्याच्या पत्नीचे पॅनकार्ड, आधार कार्ड व मुलांचे आधार कार्ड, त्याचे ड्रायव्हींग लायसन्स इ. दिसून आले नाही. तसेच, लक्ष्मण शिवप्पा धोत्रे याने त्याच्या टेम्पो क्र. एम.एच.०२/वाय.ए./३३३२ मध्ये ठेवलेल्या पॉकेटमधून रोख रक्कम, तसेच, आधार कार्ड, पॅन कार्ड, मतदान कार्ड चोरीस

गेल्याचे फिर्यादीला सांगितले. त्यामुळे फिर्यादीने पुर्णगड सागरी पोलीस ठाण्यात लेखी फिर्याद दाखल केली.

३.                त्या अनुषंगाने, पुर्णगड सागरी पोलीस ठाण्यात गु.र.क्र.३८/२०१८ दाखल झाला. त्याचा पुढील तपास पोलीस हवालदार श्री. यु.एल. धुमास्कर व श्री.जी. आर. जाधव यांनी केला. तपास अधिकारी यांनी आरोपीच्या अंगझडतीचा पंचनामा केला, घटनास्थळ पंचनामा केला, नकाशा काढला, मुद्देमाल पावती तयार केली, निवेदन व जप्ती पंचनामा केला आणि साक्षीदारांची तपास टिपणे नोंदवली. तपास पूर्ण झाल्यानंतर आरोपींचे विरुद्ध दोषारोपपत्र दाखल करण्यात आले.

४.                त्या अनुषंगाने, माझे पुर्वपिठासीन अधिकाऱ्यांनी आरोपी क्र.१ व २ यांच्या विरुद्ध निशाणी ९ अन्वये, भारतीय दंड विधान, १८६० चे कलम ३७९ सह ३४ अन्वये दंडनिय अपराध केल्याबाबत, दोषारोप विरचित केला. त्यामधील मजकूर आरोपींना वाचून आणि समजावून सांगितला. आरोपींनी गुन्हा कबूल नसल्याचे सांगितले व संपरिक्षा घेण्याचे सुचविले.  आरोपींचे विरुद्ध कोणतीही गुन्हेविषयक परिस्थीती अभिलेखावर उपलब्ध न झाल्यामुळे त्यांचे फौ. प्र. संहिता कलम ३१३ अन्वयेचे निवेदन नोंदवण्यात आले नाही.

५.                माझ्यासमोर आलेले प्रश्न आणि त्यावरील माझे निष्कर्ष खालीलप्रमाणे आहेत : –

| | <u>प्रश्न</u> | <u>निष्कर्ष</u> |
|---|---|---|
| १. | दि.१८/०७/२०१८ रोजी संध्याकाळी ०५.०० वा. चे सुमारास  आठवडा बाजार, ग्रामपंचायत जाणारे रस्त्यावर, पावस, ता.जि.रत्नागिरी येथे आरोपींनी त्यांच्या समान उद्देशाच्या पुनर्सरनार्थ फिर्यादीने बोलेरो गाडीमध्ये ठेवलेली | नकारार्थी. |

| | | |
|---|---|---|
| | सोन्याची नथ व सोन्याचा मोहर्तमणी, रोख रक्कम, फिर्यादीचे व त्याच्या पत्नीचे पॅनकार्ड, आधार कार्ड व मुलांचे आधार कार्ड, ड्रायव्हींग लायसन्स, तसेच, साक्षीदार लक्ष्मण शिवप्पा धोत्रे याच्या टेम्पोमधून रोख रक्कम, आधार कार्ड, पॅन कार्ड, मतदान कार्ड या वस्तू त्यांच्या संमतीवाचून लबाडीच्या इराद्याने अप्रामाणिकपणे स्थानभ्रष्ट केल्या व त्याद्वारे आरोपींनी भारतीय दंड विधान, १८६० चे कलम ३७९ सह ३४ अन्वये गुन्हा केला, असे अभियोग पक्षाने सिद्ध केले आहे काय ? | |
| २. | आदेश काय ? | आरोपींची निर्दोष मुक्तता करण्यात येते. |

## <u>कारणमीमांसा</u>

**<u>प्रश्न क्रमांक १ बाबत</u> : –**

६. पुराव्याचे विवेचनाला सुरुवात करणेपूर्वी काही गोष्टींची नोंद घेणे महत्वपूर्ण ठरते. त्यामध्ये फिर्यादी व आरोपी यांचे दरम्यान आपापसात तडजोड झाली आहे. तशा आशयाची पुरशीस (नि.क्र.४४) अभिलेखावर दाखल आहे. खटल्यातील आरोप लक्षात घेता मी सदरची पुरशीस स्वीकारली नाही व सरकार पक्षाला साक्षीदार तपासण्यास आदेशीत केले.अभियोग पक्षातर्फे फिर्यादी योगेश (स.सा.क्र.१) याची साक्ष नोंदवून झाल्यानंतर पुरावा बंदची पुरशीस (नि.क्र.४५) दाखल करण्यात आली. या पार्श्वभुमीवर अभिलेखावरील पुराव्याचे साकल्याने खालीलप्रमाणे अवलोकन केले आहे.

७. अभियोग पक्षातर्फे योगेश (स.सा.क्र.१) याने त्याच्या साक्षीमध्ये (नि.क्र.२४) असे कथन केले आहे की, सन २०१८ साली त्याचा भाजी विक्रीचा व्यवसाय

होता. तो व त्याची पत्नी योजना असे दोघे मिळून आठवडे बाजार, रत्नागिरी येथे भाजी विक्रीचा व्यवसाय करत होते. भाजी घेवून येण्यासाठी मॅक्सी ट्रॅक बोलेरो एम.एच.०४/डब्ल्यू/१७४२ वापरत होते. दि. १८/०७/२०१८ रोजी पावस येथे आठवडे बाजार होता. त्यामुळे ते व त्यांची पत्नी असे दोघे भाजी घेवून ते मॅक्सी ट्रॅक बोलेरो गाडीने पावस येथे भाजी विक्रीकरीता ग्रामपंचायतजवळ आठवडेबाजारमध्ये गेले होते. टेम्पो हॉटेलच्या शेजारी वडाच्या झाडाच्या बाजूला लावलेला होता. गाडीमध्ये असलेल्या लॉकरमध्ये त्याच्या पत्नीची पर्स ठेवलेली होती. पर्समध्ये २ ग्रॅमची सोन्याची चेन, एक ग्रॅम वजनाचा मुहूर्तमणी व रोख रक्कम १,६००/–, त्याचे व त्याच्या पत्नीचे आधार कार्ड, मुलगा चिन्मय, निकुंज व काजल यांचे आधार कार्ड ठेवलेले होते. तसेच, सासू वैशाली गोडबोले व त्याचे ड्रायव्हींग लायसन्सदेखील त्यामध्ये ठेवलेले होते. सदरची पर्स गाडीमधील लॉकरमध्ये ठेवलेली होती. बाजूला असलेला व्यापारी लक्ष्मण धोत्रे याने त्याची गाडी फिर्यादीच्या शेजारी लावलेली होती. फिर्यादीच्या गाडीमध्ये दोन मुले बसलेली होती. त्यावेळी तो भाजी विक्री करत होता. सदरची गोष्ट धोत्रे याने त्याला येवून सांगितली. तो स्वतः व धोत्रे असे दोघे मिळून त्याच्या गाडीकडे गेले. तेथे दोन मुले होती. एका मुलाने लाल कलरचा शर्ट व निळ्या रंगाची जीन्स पॅन्ट, दुसऱ्या मुलाने शर्ट व बरमुडा घातलेला होता. त्यांना बघताच दोघे आरोपी पळू लागले. त्यांनी आरोपींना थांबा म्हणून हाक मारली. परंतु, ते पळून गेले होते. फिर्यादीच्या गाडीमधील लॉकरमध्ये ठेवलेली त्याच्या पत्नीची पर्स आरोपींनी चोरुन नेलेली होती कारण ती त्याला गाडीमधील लॉकरमध्ये मिळून आली नाही. त्यानंतर त्याने पुर्णगड पोलीस स्टेशनला चोरीच्या घटनेची फिर्याद (नि.क्र.२५) दाखल केली होती. पोलीसांनी त्या मुलांकडून चोरीला गेलेले दागिने, रोख रक्कम जप्त केलेली होती. त्यांची नावे ओमकार नैकर व सिद्धेश शिवगण अशी असल्याचे पोलीसांकडून समजलेले होते. त्याला पोलीसांकडून चोरीला गेलेले दागिने व कागदपत्र मिळालेले होते. रोख रक्कम व लायसन्स मिळालेले नव्हते. परंतु, आरोपीतर्फे घेतलेल्या उलटतपासात त्याने कथन केले की, पावस येथे जो बाजार भरतो तेथे त्याचे वाहन एका ठिकाणी व बाजार दुसऱ्या ठिकाणी आहे. पावसचा बाजार हा पंचक्रोशीतील मोठा बाजार असल्यामुळे तेथे लोकांची खरेदी विक्रीसाठी

मोठी गर्दी असते. त्यामुळे विक्रेत्याचे संपूर्ण लक्ष आपल्या मालाकडे असते. त्याच्या वाहनामध्ये काय चालू आहे ते त्याने पाहिले नाही. त्या वाहनात कोण बसले आहे ते त्याला माहित नव्हते. अशा वेळी मौल्यवान वस्तू तो त्याच्याकडे ठेवतो. सदरची व्यक्ती कोण आहे याची त्याला माहिती नसल्यामुळे त्याने पोलीसांकडे तक्रार देत असताना त्यांची नावे दिली नाहीत. त्याने फिर्यादमध्ये सुद्धा संशयीत चोराचे नाव दिले नाही. त्याला लिहीता येत नाही. त्याने पोलीस स्टेशनला स्वतः फिर्याद लिहून दिली नाही. त्यामुळे फिर्यादमध्ये काय नमूद केले आहे ते त्याला माहित नाही. जी काही नावे दिली ती पोलीसांनी दिली आहेत, ती नावे त्याने दिली नाहीत. त्याला आरोपींविरुद्ध आता पुढे केस चालवायची नाही व साक्षीदार तपासायचा नाही. तसेच, त्याने विद्वान सरकारी वकीलातर्फे घेतलेल्या फेरतपासात असे कथन केले की, त्याला त्याच्या चोरीस गेलेल्या सर्व वस्तू परत मिळाल्यामुळे तो आज न्यायालयात असे सांगत आहे की, त्याची आता आरोपींविरुद्ध कोणतीही तक्रार नाही. थोडक्यात, त्याने अभियोग पक्षास समर्थन नाकारले.

८. एकंदरीत, अभियोग पक्षातर्फे फिर्यादी योगेश (स.सा.क्र.१) याच्या साक्षीतून त्याच्या बोलेरो गाडीतून सोन्याचे दागिने, रोख रक्कम, आधार कार्ड इ. वस्तूंची व साक्षीदार लक्ष्मण शिवप्पा धोत्रे याच्या टेम्पोमधून रोख रक्कम, आधार कार्ड, पॅन कार्ड, मतदान कार्ड अशा वस्तू चोरुन नेणाऱ्या व्यक्ती म्हणुन आरोपींची ओळख समोर येत नाही. उपलब्ध पुरावा अत्यंत त्रोटक स्वरुपात पुढे येतो. न्यायालयाबाहेर झालेली तडजोड लक्षात घेता, अभियोग पक्षातर्फे अन्य साक्षीदारांची साक्ष नोंदवण्यात आली नाही. आरोपींचे विरुद्धचा गुन्हा अभिलेखावर निःसंशयरित्या शाबित होत नाही. सबब, संशयाचा फायदा आरोपींना देण्यात येतो. यास्तव, वरील सर्व पुराव्याचे विवेचनावरुन प्रश्न क्र.१ चे उत्तर नकारार्थी देते.

**प्रश्न क्रमांक २ बाबत : –**

९. आरोपींचे विरुद्धचा दोषारोप संशयापलीकडे शाबित करण्याइतपत सबळ पुरावा अभियोग पक्षाने न्यायालयासमोर आणलेला नाही. या कारणास्तव, आरोपींना

भारतीय दंड विधान कलम ३७९ सह ३४ अन्वये दंडनीय अपराधातून निर्दोष मुक्त करणे क्रमप्राप्त आहे. वर नमूद कारणास्तव, प्रश्न क्रमांक २ च्या अनुषंगाने, मी खालील आदेश पारीत करीत आहे –

## आदेश

१. आरोपी क्र.१ व २ यांची फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २४८(१) प्रमाणे, भारतीय दंड विधान, १८६० चे कलम ३७९ सह ३४ अन्वये शिक्षेस पात्र असलेल्या गुन्ह्यांच्या आरोपातून, निर्दोष मुक्तता करण्यात येत आहे.

२. आरोपींचा जामीन व बंधपत्र रद्द करण्यात येतात. त्यांना मुक्त करण्यात येते.

३. अपिलाचा कालावधी संपल्यानंतर, जप्त मुद्देमाल म्हणजेच, सॅमसंग कंपनीचा मोबाईल सीमकार्डसह, रोख रक्कम रु.२९५/–, आयटेल कंपनीचा मॉडेल नंबर आयटी १५०८ प्लस मॉडेलचा मोबाईल सीमकार्डसह, रोख रक्कम रु.९००/– हा मुद्देमाल संबंधीत मुळ मालकास परत देण्यात यावा.

४. जप्त मुद्देमाल म्हणजेच गुलाबी काळ्या रंगाची लेडीज पर्स, दोन ग्रॅम वजनाची सोन्याची नथ, एक ग्रॅम वजनाचा सोन्याचा मोहर्त मणी, रोख रक्कम रु.१२०५/–, आधारकार्ड योगेश तानाजी बाणे, योजना योगेश बाणे, चंद्रभागा तानाजी बाणे, काजळ मंगेश बाणे, चिन्मय योगेश बाणे, निकुंज योगेश बाणे, वैशाली पांडुरंग थोरबुके यांचे, पॅनकार्ड योगेश तानाजी बाणे व योजना योगेश बाणे यांचे, भारत निवडणुक आयोग ओळखपत्र योजना योगेश बाणे यांचे, हा मुद्देमाल फिर्यादीच्या ताब्यात या पुर्वीच फौ. किर. अर्ज क्र.४१९/२०१८ मधील दि.२५/०१/२०१९ रोजीच्या आदेशाने देण्यात आलेला आहे. सदर वस्तूंचा ताबा फिर्यादीकडे अपिलाचा कालावधी संपल्यानंतर कायम करण्यात यावा.

५. आरोपींनी फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम ४३७–अ अन्वये जामिन कदब्याची पुर्तता करावी.

६. या न्यायनिर्णयाची माहिती ना. उच्च न्यायालय, मुंबई यांच्याकडील फौजदारी अपिल एस.टी.क्र.३९०/२०१९ च्या न्यायनिर्णयातील निर्देशानुसार जिल्हादंडाधिकारी, रत्नागिरी यांना कळवण्यात यावी.

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by SUNAYANA SACHINKUMAR PINGALE
Date: 2026.04.04 18:25:29 +0530

ठिकाण – रत्नागिरी. (श्रीम.एस.एस.पिंगळे)

दिनांक – ०४/०४/२०२६ मुख्य न्यायदंडाधिकारी, रत्नागिरी.

-:CERTIFICATE:-

I affirm that the contents of this Pdf file Judgment are same word as per original Judgment.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | :- | S.S.Sane, Stenographer Grade II |
| Court Name | :- | The Court of Chief Judicial Magistrate, Ratnagiri |
| Date of decision | :- | 04/04/2026 |
| Judgment signed by P.O. on | :- | 04/04/2026 |
| Judgment uploaded on | :- | 04/04/2026 |